# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## प्रकटन

**विषय : जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबत...**

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी लेखी परीक्षा दिनांक १८ जुलै, २०२३ ते दिनांक १ ऑगस्ट, २०२३ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची पुरवणी लेखी परीक्षा दिनांक १८ जुलै, २०२३ ते ८ ऑगस्ट, २०२३ व माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान या विषयांची ऑनलाईन परीक्षा दिनांक ९ व १० ऑगस्ट २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

तथापि परीक्षा कालावधीत दिनांक २०/७/२०२३ रोजी व दिनांक २८/७/२०२३ रोजी राज्यातील काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला होता. त्यानुसार शासनाने शाळांना सदर दिवशी सुट्टी जाहीर केलेली होती. त्यामुळे संपूर्ण राज्यात दिनांक २०/७/२०२३ रोजी असलेल्या इयत्ता १२ वी च्या विषयाची परीक्षा दिनांक ११/८/२०२३ रोजी व इयत्ता १० वीच्या विषयाची परीक्षा दिनांक ०२/०८/२०२३ रोजी घेण्यात आली. तसेच २८/७/२०२३ रोजी असलेल्या इयत्ता १० वी च्या विषयाची परीक्षा दिनांक ०३/०८/२०२३ रोजी घेण्यात आली.

सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येत असून निकालाची कार्यपध्दती व त्याच्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा ऑनलाईन निकाल **www.mahresult.nic.in** या संकेतस्थळावर सोमवार, दिनांक २८/०८/२०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल.

२) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन इ.१० वी साठी (http://verification.mh-ssc.ac.in) व इ.१२ वी साठी (http://verification.mh-hsc.ac.in) स्वतः किंवा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी मंगळवार, दिनांक २९/०८/२०२३ ते गुरूवार, दिनांक ०७/०९/२०२३ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

३) जुलै-ऑगस्ट २०२३ पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४) फेब्रुवारी-मार्च २०२४ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षेस ज्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट व्हावयाचे आहे अशा नियमित, पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे व ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जातील. त्याच्या तारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

५) फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये प्रथम नोंदणी करून परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/ गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस पुनःश्च प्रविष्ट होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली असून सदर विद्यार्थ्यांना श्रेणीसुधारसाठी फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षा ही अंतिम संधी असेल याची नोंद घ्यावी. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी यांना श्रेणीसुधार योजनेंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होता येणार नाही.

६) जुलै-ऑगस्ट २०२३ च्या परीक्षेमध्ये सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तरतुदींच्या अधीन राहून पुढील सलगच्या दोन संधी उपलब्ध राहतील.

दि.२७/०८/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

क्र./नाविमं/उमा/अ—२/ 2085
नाशिक—४२२००३
दिनांक: २७/०८/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाचे प्रकटन प्राप्त झाले असून सदर प्रकटनाची नोंद घेऊन त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांनी आपल्या सूचना फलकावर लावून सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

27/8/23

(डॉ. मच्छींद्रनाथ कदम)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३